महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN : U40109MH2005SGC153645

दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
फॅक्स नं. : ०२२-२६५८१०८३
Email : ciro@mahadiscom.in
Websitee : www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी - ९, प्रकाशगड, ४ था मजला,
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

**जा. क्र. : औसंवि/अ/१८३५१** **दिनांक : ०२.११.२०२०**

**प्रति,**
**मुख्य अभियंता,**
**म. रा. वि. वितरण कंपनी मर्या.**
**सर्व परिमंडळ कार्यालये,**

**विषय:** मनुष्यबळाबाबतच्या निविदा प्रक्रिया विहीत कालावधीत पुर्ण करणेबाबत.

*****

उपरोक्त विषयानुसार बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांचे वेतन संपर्क पोर्टल या प्रणालीद्वारे करण्याबाबत सांघिक कार्यालयाकडुन वेळोवेळी सुचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत.

बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांचे वेतन संपर्क पोर्टल प्रणाली मार्फत सुरु करण्याबाबत मा. संचालक (मासं) महावितरण यांनी दि.२९.१०.२०२० रोजी ऑनलाईन व्हिसीद्वारे आढावा बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत बहुतांश मंडळ कार्यालय यांनी संपर्क पोर्टलमध्ये कंत्राटदार व बाहयस्त्रोत कंत्राटी कामगार यांची माहीती अद्ययावत केलेली नाही असे आढावा बैठकीत निदर्शनास आले याबाबत सदर बैठकीत संपर्क प्रणालीमध्ये कंत्राटदार व बाहयस्त्रोत कंत्राटी कामगार यांची माहीती तातडीने अद्ययावत करण्याबाबत संबंधीतांना निर्देशित केले आहे याबाबत दि.०४.११.२०२० रोजी पुन:श्च आढावा बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

तसेच, काही मंडळ कार्यालयामध्ये चालु असलेल्या निविदेचा कालावधी हा पुर्ण होण्याचा १ ते २ महिने आधी नविन निविदेची कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे. परंतु, तसे न झाल्यामुळे निविदा प्रक्रिया विविध कारणास्तव प्रलंबित होऊन सदर निविदा प्रक्रियेस विलंब होतो त्यामुळे पर्यायाने वीज पुरवठयाशी संबंधीत सेवा देण्यासाठी कंत्राटी कामगार पुरवण्याचे काम कोटेशन-बेस पध्दतीचा अवलंब करावा लागतो. त्यामुळे संपर्क पोर्टलमध्ये अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

याद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, मंडळस्तरावर चालु असलेल्या निविदा प्रक्रियेचा कालावधी संपण्याआधी नविन निविदा प्रक्रिया ही २ महिन्याआधी सुरु करण्यात यावी जेणेकरुन, चालु निविदेचा कालावधी संपुष्टात आल्यांनतर त्वरीत नविन निविदेनुसार कार्यादेश देणे शक्य होईल व संपर्क पोर्टल मध्ये अडचणी निर्माण होणार नाहीत.

सबब, उपरोक्त कार्यवाहीबाबत सबंधीत कार्यालयांना आपल्या स्तरावर अवगत करावे.

(संजय रा. ढोके)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

**प्रत सविनय सादर :**
संचालक (मासं) महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना :**
१. अधिक्षक अभियंता, सर्व मंडळ कार्यालये, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या.
२. उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सर्व परिमंडळ कार्यालये, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या.